REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

" अर्थ "

" दुर्गाधिवास " पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ — पुणें, बुधवार तारीख २२ जून, १९४९ — अंक २५

## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—*अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात*—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली — चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे

मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी — **महिंद्रकर ब्रदर्स** — बुधवार चौक, पुणें




माणिक नं. 20

कपड्याकरितां उत्तम साबण

माणिक सोप वर्क्स

...कराड, (सातारा)...

## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई,
एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू,
बुधवार चौक, पुणें २

केळकर बंधू, (शाखा)
मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**पाणी खेचण्यासाठी पवनचक्क्या**—हिंदुस्थानांत पवनचक्क्या चालवून शेतीसाठी पाणीपुरवठा करणें कितपत शक्य आहे हें पहाण्यासाठी सहा ठिकाणीं प्रयोगकेंद्रें उघडण्याचें हिंद सरकारनें ठरविलें आहे. हीं केंद्रें अलाहाबाद, अहमदाबाद, बेळगांव, पुणें, कोइमतूर आणि पुसा ह्या ठिकाणीं रहातील. जमिनींतील पाण्याची खोली आणि पवनचक्क्या चालण्यासाठी जरूर असलेला वाऱ्याचा वेग ह्या दोन्ही गोष्टींची वर निर्दिष्ट केलेल्या भागांत विशेष अनुकूलता आहे.

**कामगारांसाठी घरांची योजना**—मुंबई प्रांतांतील कामगारांसाठी घरें बांधण्याच्या योजनेला लागणाऱ्या भांडवली खर्चांतील दोन तृतीयांश हिस्सा मध्यवर्ती सरकारनें देऊं केला आहे. मुंबई प्रांताला हें कर्ज बिनव्याजी मिळणार आहे. पाटबंधाऱ्यांचीं कामें, रस्ते इत्यादि अधिक तांतडीच्या कामावर खर्च करणें जरूर असल्यामुळें प्रांतिक सरकारला कामगारांच्या घरांचा सर्व खर्च करतां येण्यासारखा नव्हता. ह्या योजनेसाठी प्रांतिक सरकारनें कर्ज काढलें तर प्रत्येक बिऱ्हाडकरूस दरमहा ५८ रु. भाडें द्यावें लागेल. मध्यवर्ती सरकारची मदत आणि मालकवर्गाकडील वर्गणी ह्यांच्या साह्यानें मात्र दर बिऱ्हाडाला दरमहा २१ रुपयांत जागा मिळूं शकेल. हिंद सरकार मजुरांच्या रहाण्याच्या जागेसाठी एका योजनेचा विचार करीत आहे. ह्या योजनेला १० कोटी रुपये खर्च येईल आणि तीबरहुकूम १० हजार घरें बांधण्यांत येतील, असा अंदाज आहे.

**मनमाड अंमळनेर रेल्वे रस्ता**—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे हिंद सरकारकडे एक विनंतिपत्र पाठविण्यांत आलें आहे मनमाड–मालेगांव–धुळे–अंमळनेर ही गांवें जोडणारा एक रेल्वेचा फांटा लवकर बांधण्यांत यावा अशी विनंति व सूचना चेंबरनें केली आहे. गेल्या कांस वर्षांत ह्या भागाचा व्यापार आणि उद्योग धंदे ह्यांच्या दृष्टीनें बरीच प्रगति झालेली असल्यानें अशा रेल्वे–रस्त्याची जरूरी आहे, असें चेंबरचें म्हणणें आहे.

**कानपुरांत पाणी वांचविण्याची मोहीम**—कानपूर शहरांत पाणी वांचविण्याची एक मोहीम लवकरच चालू होणार आहे. घरोघरीं फिरून गळके नळ आणि तोट्या तपासण्याचें काम नगरपालिकेचें पाणी पुरवठा खातें करणार आहे. नळ दुरुस्तीचें काम करणाऱ्या अधिकृत लोकांकडून नागरिकांनीं आपल्या घरांतील नळ आणि तोट्या दुरुस्त करून घ्याव्या अशा सूचना देण्यांत आल्या आहेत. गेल्या सालीं अशा प्रकारची मोहीम अंगिकारण्यांत आली होती आणि त्यावेळीं रोजीं २० गॅलन पाणी वाचलें होतें.

**वृत्तपत्रांतील जाहिरातींवर कर**—मद्रास सरकारनें सर्व प्रकारच्या जाहिरातींवर १० टक्के कर बसविणारा कायदा करण्याचें ठरविलें आहे. ह्या कर–आकारणींत वृत्तपत्रांतील जाहिरातींचाहि समावेश करण्यांत येणार आहे. बिलाचा खर्डा लवकरच प्रसिद्ध होईल. प्रांतिक खजिन्यांत ह्या करामुळें २० लाख रुपयांची भर पडेल असा अंदाज आहे.

**संयुक्त प्रांतांत सिमेंटच्या कारखाना**—संयुक्त प्रांत सरकारनें मिर्झापुर पासून ५२ मैलावरील रॉबर्ट्स गंज येथें एक सिमेंटचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. सरकारतर्फे उघडण्यांत येणारा हा पहिलाच कारखाना असून त्यांत दररोज ७०० टन सिमेंट तयार होईल. ह्या शिवाय प्रांतांत आणखीही कांहीं ठिकाणीं सिमेंटचे कारखाने उघडण्याचा विचार सरकार करीत आहे. रॉबर्ट्स गंज येथील कारखान्याच्या उत्पादनानें प्रांताला लागणाऱ्या सिमेंटपैकीं ½ गरज भागेल असें समजतें.

**बँकांना हिशेबासाठी सुट्या**—मुंबई सरकारनें ता. १ जुलै व ३१ डिसेंबर ह्या दोन दिवशीं बँकांचे सहामाही आणि वार्षिक हिशेब पुरे करतां यावे म्हणून सुट्या जाहीर केल्या आहेत. ह्या दिवशीं सरकारी कचेऱ्या मात्र चालू रहाणार आहेत. पुढील शहरांतील बँका वरील दोन दिवशीं बंद राहतील, मुंबई, पुणें, अहमदाबाद, नाशिक, देवळाली, सुरत, बलसार, भडोच, सोलापूर, नडिआद, गोध्रा, धुळें, जळगांव, बेळगांव, हुबळी आणि गदग.

**मध्यप्रांतांत सुताची गिरणी**—मध्यप्रांत सरकारच्या नागरी पुरवठा खात्यानें २५,००० चात्या असणाऱ्या एका सुताच्या गिरणीला खास परवाना देण्याचें ठरविलें आहे. ह्या नव्या गिरणीवर अशी अट घालण्यांत आली आहे कीं, तींत तयार होणारें सूत प्रांतिक विणकर सहकारी संस्थेलाच फक्त देण्यांत यावें. ह्या संस्थेनें सुताचा उपयोग हातमाग आणि यंत्रचलित माग ह्यांच्यावर कापड काढण्यासाठी करावयाचा आहे.

**पावसाच्या पाण्यावर प्रयोग**—पावसाच्या पाण्याचें रासायनिक पृथःकरण करण्याचे प्रयोग हिंदुस्थान सरकारचें हवामान खातें प्रथमच करणार आहे. पावसाचें पाणी शुद्ध स्वरूपांत निरनिराळ्या ठिकाणीं बाटल्यांतून जमविण्यांत येईल. ह्या पाण्यांत क्लोरीन, फ्री अमोनिआ, अल्बुमिनॉइड, सल्फेट, नैट्रोजन, इत्यादि द्रव्यें किती प्रमाणांत असतात ह्यासंबंधीं पृथःकरण करण्यांत येणार आहे. ह्या पृथःकरणाला केवळ शास्त्रीयच महत्त्व आहे असें नाहीं. पावसाच्या पाण्याचें पृथःकरण करून त्यायोगें जमिनीचा कस किती वाढतो ह्यासंबंधीं अधिक ज्ञान मिळण्याचा संभव आहे, असें तज्ज्ञ म्हणतात.

**मुंबई प्रांतांतील धान्याचा सांठा**—मुंबई सरकारच्या नागरी पुरवठा मंत्र्यांनीं प्रांतांतील अन्नधान्याच्या सांठ्यासंबंधीं पुढील प्रमाणें माहिती सांगितली. अन्नधान्याची वसुली अपेक्षेपेक्षा चांगली म्हणजे जवळजवळ दुपटीनें झाली. तरी सुद्धा, प्रांताला २,००,००० टन अन्नधान्याची टंचाई भासेल. ही टंचाई मध्यवर्ती सरकारनें मदत केली तरच भरून निघेल. त्यांतल्या त्यांत तांदुळाचा पुरवठा अपुरा आहे. मुंबई प्रांतांतील दुष्काळी भागांत अन्नधान्य आणि वैरणकाडी ह्यांचा पुरवठा समाधानकारक आहे.

**कापडाची निर्यात**—कापडाची निर्यात करणाऱ्या कंपन्यांना हिंद सरकारनें सर्व प्रकारच्या सवलती देण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. कापडाची निर्यात वाढविण्यासाठी ह्या सवलती देण्यांत येणार आहेत. हिंद सरकारच्या टेक्सटाईल कमिशनरनें मुंबई व अहमदाबादमधील ३४ कंपन्यांना कापडाचे घाऊक निर्यात व्यापारी म्हणून मान्यता दिली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जून १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## खोट्या बातम्या व कंड्या ह्यांचे दुष्परिणाम

### बँकांस संरक्षण कसें मिळेल ?

कोणत्याहि बँकेच्या भक्कमपणाविषयीं व स्थैर्याविषयीं खोट्या बातम्यांस चालना देणें, हा एक गुन्हा समजण्यांत यावा, अशा अर्थाची एक सूचना पंजाब चेंबर ऑफ कॉमर्सनें हिंदुस्थान सरकारास केली आहे. बँकांवरील लोकांचा विश्वास व बँकांची पत ही अत्यंत नाजूक बाब असते आणि त्यांचा संभाळ काळजीपूर्वक करणें अत्यावश्यक ठरतें. हिंदुस्थानांत बँकिंगचा प्रसार अद्याप फारसा झालेला नाहीं. त्याचप्रमाणें, एकूण ठेवींत करंट ठेवींचें, म्हणजे तात्काळ काढून घेतां येतील अशा ठेवींचें प्रमाण वाढत आहे, ही गोष्टहि महत्त्वाची आहे. १८३८-३९ मध्यें शेड्यूल्ड बँकांकडे २२७ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या त्यांपैकीं १२४ कोटी रुपयांच्या ठेवी करंट स्वरूपाच्या होत्या. १९४७-४८ मधील १०५१ कोटी रुपयांच्या ठेवींपैकीं ७०७ कोटी रुपये करंट ठेवींचे होते. ३ जून, १९४९ अखेरचे ताजे आकडे पाहिले, तर ८७६ कोटी रुपयांच्या ठेवींत ५९५ कोटी रुपये करंट ठेवींचे आहेत. खोट्या बातम्या किंवा अफवा ह्यांमुळें करंट ठेवी एकदम कमी झाल्या, कीं चांगल्या बँकांचीहि पत कशी व किती काळ टिकणार ?

बँकांजवळील ठेवींचा त्यांनीं केलेला विनियोग पाहिला, तर कर्जांमध्यें त्यांची रक्कम अधिकाधिक गुंतून राहिलेली आपणांस आढळते. खालील आकडे पहाः—

| | अ<br>एकूण ठेवी<br>(कोटी रु.) | ब<br>कर्जें व डिस्कौंट केलेलीं बिलें (कोटी रु.) | ब चें अ शीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९३८-३९ | २२७ | ११६ | ५३·१५ |
| १९४७-४८ | १०५१ | ४४४ | ४२·३० |
| ३ जून, १९४९ | ८७६ | ४८३ | ५५·१४ |

युद्धकाळांत, कर्जांचें ठेवींशीं प्रमाण अगदी कमी म्हणजे २३·८०% होतें, परंतु तें आतां वाढत चाललें आहे. त्याचें कारण एकीकडे कर्जांत वाढ होत गेली परंतु दुसरीकडे ठेवी कमी कमी होत गेल्या. अशा परिस्थितींत, बँकांविषयीं गैरविश्वास निष्कारण पसरूं लागला, तर त्यांना कर्जें आखडती घेऊन व रोख रकमा ज्यास्त बाळगून पैशाचा तरतेपणा राखून ठेवणें भाग पडेल. सहाजीकच, त्यामुळें पैशाची तंगी वाढेल. पंजाब चेंबर ऑफ कॉमर्सनें, बँकांविरुद्ध आगळीक करणारांचा बंदोबस्त करण्यासाठी कायदेशीर तजविजीची मागणी केली आहे, तिचें रहस्य वरील तुलनात्मक आकड्यांवरून लक्षांत येईल. वृत्तपत्रें, पाट्या, फलक, इत्यादींचे द्वारां होणारी नालस्ती थांबावी, असा चेंबरचा उद्देश आहे; खासगी भाषणांतील चर्चा कायद्याचे कक्षेंत यावी असें त्याचें म्हणणें नाहीं. चेंबरनें आपल्या मागणीच्या समर्थनार्थ अमेरिकेंतील कांहीं संस्थानांतील कायद्यांचे दाखले दिले आहेत. अशा तऱ्हेच्या कायद्याचा व्यावहारिक उपयोग कितपत होईल, हा अर्थातच विचार करण्याजोगा प्रश्न आहे. तथापि, खोट्या बातम्या व कंड्या ह्यांपासून बँकांसारख्या संस्थांचें संरक्षण होणें आवश्यक आहे, ह्याविषयीं दुमत असण्याचें कारण नाहीं.

## मजुरांचें योग्य वेतन

हिंद सरकार आणि कामगार ह्यांच्यांत औद्योगिक शांतता पाळण्याचा तात्पुरता करार झाल्यावर त्याची अंमलबजावणी कशी करतां येईल हें पहाण्यासाठी सरकारनें एक फेअर वेजेस कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें विचारविनिमय करून कामगारांच्या योग्य वेतनाबद्दल आपला अहवाल तयार केला आहे. इतर पुढारलेल्या देशांतून कामगारांना जीवन-वेतन देण्याचें ध्येय पुढें ठेवण्यांत आलेलें असतें. तथापि हिंदुस्थानच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितींत हें ध्येय कितपत साध्य करता येईल ह्याविषयीं शंकाच आहे. तरी पण मजुरांना किमान वेतन मिळणें हा त्यांचा हक्क अमान्य करतां येण्यासारखा नाहीं. वेतन-समितीनें ह्या दोन्ही दृष्टिकोनांचा विचार करून मधला मार्ग स्वीकारला आहे असें समजतें. किमान वेतनांत थोडेंबहुत शिक्षण, वैद्यकीय मदत आणि जगण्या इतपत पैसा ह्यांचा समावेश कमिटीनें केला आहे. ह्यापैकीं शिक्षण आणि वैद्यकीय मदत ही सरकारची जबाबदारी आहे असें मालकवर्गाचें म्हणणें आहे. १९३९ चा जीवन-खर्चाचा निर्देशांक १०० असा धरून त्याला अनुसरून १६० ते १७५ ह्या निर्देशांकावर मूळ पगार ठरवावा अशी कमिटीनें शिफारस केली आहे. सगळ्यांत कमी पगार असणाऱ्या कामगारांना मूळ पगारांत १०० टक्के वाढ देण्याचें धोरण ठेवण्यांत यावें; त्यानंतर पगाराच्या आकड्यांचे निरनिराळे गट करून पगारांत निरनिराळ्या प्रमाणांत वाढ करावी असेंही कमिटीनें सुचविलें आहे. त्याशिवाय महागाई भत्त्याच्या चालू पद्धतीचाही पुरस्कार करण्यांत आलेला आहे. योग्य वेतनाचा विचार करतांना पुढील चार मुद्यांचा विचार करावा असें कमिटीनें सुचविलें आहे. (१) कामगारांच्या कामाची उत्पादनक्षमता (२) त्याच धंद्यांतील इतर ठिकाणचें वेतन (३) राष्ट्रीय उत्पन्न आणि त्याची वाटणी आणि (४) विवक्षित उद्योगधंद्याचें देशाच्या अर्थव्यवस्थेंतील स्थान. कमिटीवर मजुरांचे, मालकांचे आणि सरकारचे प्रत्येकी चार प्रतिनिधी नेमलेले आहेत. कमिटीनें केलेल्या शिफारशींवर आणखी चर्चा करण्यांत येत आहे. तींतून योग्य वेतनासंबंधीं समाधानकारक मार्ग काढण्यांत आला, तर उत्पादन वाढींतील एक मोठा अडथळा दूर होईल.

### कंदिलांच्या धंद्यास आणखी दोन वर्षें संरक्षण

हातकंदिलांना दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९५० रोजीं संपत होती, ती दोन वर्षांनीं म्हणजे ३१ मार्च, १९५२ अखेर वाढविण्यांत यावी, अशी टारिफ बोर्डानें शिफारस केली होती. ती हिंदुस्थान सरकारनें मान्य केली आहे. आयात कंदिलांवर त्यांच्या किंमतीवर ३०% जकात घेण्यांत येते.

## सर चिंतामणराव देशमूख ह्यांची सेवानिवृत्ति

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमूख, हे जून १९४९ अखेर सेवानिवृत्त होत आहेत. शुक्रवार, ता. १७ जून रोजीं ते मुंबईहून लंडनला गेले. तेथें ते हिंद–ब्रिटन पौंडी शिलकांच्या वाटाघाटींत हिंदुस्थानातर्फे भाग घेतील, आणि ३० जून रोजीं लंडन येथेंच, त्यांच्या जागीं येणारे सर बेनेगल रामराव ह्यांच्या हातीं गव्हर्नरपदाचीं अधिकारसूत्रें देतील.

सर चिंतामणराव देशमूख हे १९१९ सालीं इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें दाखल झाले. मध्यप्रांत–वऱ्हाडांत त्यांच्या नोकरीचीं पहिलीं कांहीं वर्षें गेलीं. दिल्ली सेक्रेटरिएटमध्यें कांहीं काळ कामें केल्यावर १९३९ सालीं त्यांची रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाचे सेक्रेटरीचे जागीं नेमणूक झाली. १९४१ सालीं ते रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर झाले आणि १९४३ सालीं ते गव्हर्नर झाले. रिझर्व्ह बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर होण्याचा हा मान त्यांना मिळाला, त्यावेळीं त्यांचें वय ४७ वर्षांचें होतें. म्हणजे, तरूणपणींच ही मोठी जबाबदारीची जागा त्यांना देण्यांत आली. वर्ल्ड मॉनेटरी कॉन्फरन्सला ते १९४४ सालीं उपस्थित होते. पुढें १९४६ सालीं इ. मॉ. फंड आणि इंटरनॅशनल बँक ह्या संस्थांवर त्यांची नेमणूक झाली. सर चिंतामणरावांच्या कारकीर्दींत रिझर्व्ह बँकेच्या कार्याचें पाऊल पुष्कळच पुढें पडलें. ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याची वाढ, मॉनेटरी रिसर्च व स्टॅटिस्टिक्स खात्यांची पुनर्घटना व प्रगति, इंटर नॅशनल बँक व फंड ह्यांचे बाबतींत हिंदुस्थानास मिळालेलें महत्त्व, बँकिंग कंपन्यांच्या विद्यमान कायद्यांत मूलग्राही सुधारणा करणारा नवा व्यापक बँकिंग कंपनीज ॲक्ट, इत्यादि महत्त्वाच्या गोष्टी सर चिंतामणरावांच्या मार्गदर्शनाखालीं घडून आल्या. योग्य वेळीं स्पष्ट बोलण्याची संधी ते गमावीत नसत. उदाहरणार्थ, रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाच्या वेळीं ते म्हणाले, "राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा विचार अकालीं आहे. सध्याच्या देशांतील आर्थिक परिस्थितीचा विचार करता तसें करण्याची गरज नाहीं आणि बँकेचें बोर्डहि ह्या विचाराला अनुकूल नाहीं. बँकेच्या घटनेच्या तात्त्विक प्रश्नापेक्षा सरकारचें फडणिशी खातें आणि रिझर्व्ह बँक ह्यांचें अधिक निकट सहकार्य घडवून आणण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे." विद्वत्ता, व्यासंग, विनय, चारित्र्य, कर्तव्य-दक्षता, इत्यादि गुणांच्या मीलनामुळें सर चिंतामणरावांनीं रिझर्व्ह बँकेचें गव्हर्नर-पद अत्यंत उत्कृष्ट प्रकारें शोभविलें व इतरांना अत्युच्च आदर्श निर्माण करून ठेवला, ह्यांत संशय नाहीं. कर्तव्य-मग्न आय. सी. एस. अधिकारी सौजन्यपूर्ण व विद्वानहि (त्यांस १७ भाषा चांगल्या येतात.) असूं शकतो, हें सर चिंतामणरावांनीं चांगल्या तऱ्हेनें दाखवून दिलें आहे.

## मरीन विम्याचा सर्वांत मोठा क्लेम

दि रॉयेल मेल लाइनच्या मालकीची 'मागडालेना' ही आगबोट ब्राझील देशाच्या किनाऱ्याजवळ समुद्राच्या तळाशीं गेली. आगबोट व तिचेमधील माल ह्यांचा ३½ कोटी रुपयांचा विमा उतरलेला होता. त्यापैकीं २ कोटी, ९९ लक्ष रुपये विमा कंपन्यांनीं क्लेम येतांच तीन दिवसांत देऊन टाकले. प्रत्यक्ष नुकसानीचा हिशेब पुरा होईपर्यंत ज्यास्त रक्कम घेण्याचें आगबोट कंपनीनें नाकारलें. एका आगबोटीच्या विम्याचा एवढा मोठा क्लेम ह्यापूर्वी कधींहि आलेला नव्हता.

---

## उद्योगी कारखानदारांना श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांचा आशीर्वाद

गुरुवार, ता. १६ जून १९४९ रोजीं मराठा चेंबरच्या सभागृहांत गोपाळ सदाशिव पारखे औद्योगिक मान पारितोषिकांचा व प्रशस्तिपत्रांचा वितरण समारंभ श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांचे हस्तें पार पडला. त्यावेळीं आशीर्वादात्मक भाषण करतांना ते म्हणाले, "५०–६० वर्षांपूर्वी मला भांडवलाची अडचण भासत होती, तशी अडचण अजूनहि औद्योगिक क्षेत्रांत पुढें येणारांना भासते, हें पाहून मला दुःख होतें. माझें तरूण कारखानदारांना असें सांगणें आहे कीं, त्यांनीं सरकारी मदतीवर सर्वस्वी विसंबून न बसतां स्वावलंबन पत्करावें. औद्योगिक यशाचा मार्ग दीर्घ व खडतर असतो, हें त्यांनीं लक्षांत ठेवून निष्ठापूर्वक व धीरानें काम चालू ठेवावें. अशा कारखानदारांची महाराष्ट्रानें उपेक्षा केलेली नाहीं व तो करणारहि नाहीं आणि त्यांना यश मिळाल्याविना रहाणार नाहीं."

---

## हिंदी गिरण्यांतील कपाशीचा उठाव

हिंदी गिरण्यांत ३१–३–१९४९ अखेर संपलेल्या सात महिन्यांत एकूण २५,६४,१७४ गाठी कपास खपली. १९४७–४८ च्या तत्सम मुदतींमधील उठावाच्या आकड्यापेक्षा हा आकडा २,३७,२६९ गाठींनीं जास्त आहे. पाकिस्तानी कपाशीचा उठाव फारच कमी झाला आहे आणि एकूण उठावांतील परदेशी कपाशीचाहि हिस्सा उतरला आहे.

| कपास | ३१–३–४८ अखेरचे ७ महिने (गाठी) | ३१–३–४९ अखेरचे ७ महिने (गाठी) |
|---|---|---|
| एकूण हिंदी | १४,११,५४४ | १९,७८,९९५ |
| पाकिस्तानी | ५,२१,३४४ | २,२६,०८५ |
| एकूण विदेशी (पाकिस्तानी धरून) | ९,१५,३६१ | ५,८५,१७९ |

---

## श्री. वि. त्रिं. चितळे यांचें सुयश

डेप्युटी असिस्टंट कंट्रोलर, मिलिटरी अकौंटस, श्री. विश्वेश्वर त्रिंबक चितळे, हे पुणें विद्यापीठाच्या गेल्या बी. ए. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. २५ वर्षांपूर्वी त्यांनीं टर्म्स भरल्या होत्या परंतु त्यांना इतर जबाबदाऱ्यांमुळें शिक्षणक्रम पुरा करतां आला नाहीं. त्यावेळीं राहिलेली अतृप्त इच्छा त्यांनीं आतां वयाच्या ५४ व्या वर्षी पुरी केली आहे. श्री. अण्णासाहेब हे प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चिं. त्रिं. उर्फ अप्पासाहेब चितळे ह्यांचे ज्येष्ठ बंधू होत. ह्या दोन्ही बंधूंनीं आपआपल्या क्षेत्रांत अगदीं खालच्या पायरीपासून वर चढून उच्च स्थान प्राप्त करून घेतलें आहे.

---

## बॉंबे को. इन्शुअरन्स सोसायटीचे नवे चेअरमन

### श्री. ए. एल. चंदावरकर

मुंबईमधील एक प्रमुख व्यापारी व सहकारी कार्यकर्ते श्री. ए. एल. चंदावरकर, बी. एससी., ह्यांची बॉंबे को. इन्शुअरन्स सोसायटी लि. च्या चेअरमनचे जागीं निवडणूक झाली आहे. श्री. माधवलाल एम. भट हे ह्यापूर्वी ह्या स्थानीं होते. श्री. चंदावरकर ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं सहकारी विम्याचें पाऊल अधिक जोमानें पुढें पडेल, अशी अपेक्षा आहे.

## औद्योगिक सहकारी संस्था

### अर्थ मंत्री, श्री. मेहता, ह्यांचें भाषण

हिंदुस्थानांतील निरनिराळया प्रकारच्या सहकारी संस्थांच्या इतिहासाचा आढावा घेतांना श्री. मेहता नुकतेच म्हणाले, कीं बाँबे को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९२५ ह्या कायद्यान्वयें दोन तऱ्हेच्या सहकारी संस्थांत प्रथमच भेद दर्शविण्यांत आला. पहिल्या प्रकारच्या सहकारी संस्था मुख्यतः कच्चा माल पुरवीत, कर्जे देत अगर इतर मदत देत असत. प्रत्यक्ष उत्पादन मात्र व्यक्तिशः व्यक्ती करीत असत. ह्याच्या उलट उत्पादकांच्या सहकारी संस्थांनीं उत्पादन करणें आणि त्याची विल्हेवाट लावणें हा सर्वच व्यवहार संस्थेचा म्हणून करावा असा हेतु होता. हा फरक संस्थांच्या घटकांच्या दृष्टीनें आणि मूलभूत कल्पनेच्या दृष्टीनेंही फार महत्त्वाचा आहे. कारण, सहकारी संस्थेमुळें व्यक्तीचा फायदा होतो कीं संस्थेच्या सभासदांचा सांघिक फायदा होतो, ह्यावरच सहकारी संस्थांची घटना आणि मूलभूत कल्पना अवलंबून रहातात. बाँबे प्रॉव्हि. इन्कायरी कमिटीनें प्रथम जिल्हानिहाय सहकारी औद्योगिक संघटनेची शिफारस केली. ही शिफारस करण्यांत असा हेतु होता कीं, विणकरांना स्वस्त दरानें कच्चा माल मिळावा, त्यांचा माल विकण्याची व्यवस्था व्हावी, आणि तिच्यातर्फे सहकाराचें शिक्षण आणि प्रचारकार्य चालावें. गेल्या कांहीं वर्षांत जिल्हा औद्योगिक संघटनांची संख्या वाढली. आज अशा प्रकारचीं १५ असोसिएशन्स आहेत. ह्यांपैकीं कांहीं संघटना विणकरांच्या संस्थांखेरीज इतर प्रकारच्या ग्रामोद्योगांतही लक्ष घालतात. गेल्या दोन वर्षांत प्राथमिक संस्था, त्यांचे सभासद आणि भांडवल ह्यांची विशेष वाढ झालेली पुढील आकड्यांवरून दिसून येईल.

| वर्ष | संस्थांची संख्या | सभासदांची संख्या | खेळतें भांडवल रु. |
|---|---|---|---|
| ३०-६-४६ | १९९ | २४,७२९ | ३५,४४,६४१ |
| ३०-६-४७ | ३१४ | ४०,०४५ | ४८,४८,३४९ |
| ३०-६-४८ | ४५४ | ५९,२३३ | ८२,७३,०४८ |

गेल्या सहा महिन्यांत प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या आणखी ९३ नीं वाढली आहे. तथापि, ही प्रगति केवळ अशा प्रकारच्या संस्थांच्या संख्येपुरतीच मर्यादित नाहीं. संस्थांच्या प्रकारांतही विविध तऱ्हेची भर पडलेली आहे. नवीन प्रकारच्या संस्थांत जंगलांत काम करणाऱ्या मजुरांच्या संस्था, मधमाशा पाळणाऱ्या संस्था, वेताचें आणि बांबूचें काम करणाऱ्या संस्था, दोरखंडें तयार करणाऱ्या संस्था, कुंभारांच्या संस्था इत्यादि अनेक नव्या संस्था दिसून येतात. पुढें जिल्हानिहाय सहकारी औद्योगिक संघटनांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी एखाद्या मध्यवर्ती संस्थेची जरूर अर्थातच भासूं लागली. त्यांतून १९४६ सालीं प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्हज असोसिएशन अस्तित्वांत आली. ह्या असोसिएशनतर्फे औद्योगिक सहकारी संस्थांबद्दल अनेकविध माहिती देणारीं लहान-लहान पुस्तकें प्रसिद्ध होत असतात. त्याबद्दल आपण असोसिएशनचे ऋणी असलें पाहिजे.

प्रॉव्हिन्शिअल कॉऑपरेटिव्ह कॉन्फरन्सच्या गेल्या अधिवेशनांत छोटेखानी उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देण्यासाठी एकादी मध्यवर्ती बँक असावी अशी शिफारस करण्यांत आली होती. परंतु सरकारनें ती शिफारस मान्य केलेली नाहीं. मात्र कांहीं जिल्ह्यांतून इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्ह बँक्स स्थापन करण्याला सरकारनें मंजुरी दिली आहे. औद्योगिक सहकारी संस्थांना पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती बँकेची सरकारला जरूरी वाटली नाहीं. कारण, मध्यवर्ती सरकारनें स्थापन केलेल्या मध्यवर्ती कार्पोरेशनप्रमाणेंच एक प्रांतिक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

## अमेरिकेच्या शेतींत विजेचा वाढता उपयोग

अमेरिकेची शेती कांहीं बाबतींत विशेष आदर्श पद्धतीनें चालत असते. विजेचा उपयोग शेतीच्या विविध कामासाठी शक्य तितका जास्त करण्याकडे तेथील सरकारची दृष्टि असते. १९३५ पासून अमेरिकन काँग्रेसनें ग्रामीण विद्युत् खात्याला सुमारें १९० कोटी डॉलर्स रक्कम पुरविली. ग्रामीण विभागांत विजेचा उपयोग करून घेण्यासाठी विद्युत् खात्यामार्फत व्यक्तींना, सहकारी संस्थांना व इतर संघटनांना कर्जे दिलीं जातात. दिलेलीं कर्जे ३५ वर्षांच्या मुदतींत परत फेडावयाचीं असतात. व्याजाचा दर दोन टक्के असतो. बहुतेक कर्जे विद्युत सहकारी संस्थानांच दिलेलीं आहेत. अद्यापपर्यंत अमेरिकेंतील एकंदर शेत-मळ्यांपैकीं ६६ टक्के मळ्यांत वीज खेळवली गेली आहे. लवकरच आणखी ११ टक्के मळ्यांत विजेचा पुरवठा केला जाईल. वीज-पुरवठा दर वर्षी सरासरी १ लक्ष, ९४ हजार मळ्यांमध्यें केला जातो. सध्यां एकंदर ४० लाखांहून जास्त शेत-मळ्यांत वीज-पुरवठा झालेला आहे.

### अमेरिकेची धान्याची निर्गत

१९४९ मार्च अखेर पुऱ्या होणाऱ्या नऊ महिन्यांत अमेरिकेनें १ कोटी, ३५ लक्ष, ९१ हजार टन धान्य व धान्याचे पदार्थ यांची निर्यात केली. बहुतेक निर्यात मार्शल योजनेनुसार मदत मिळणाऱ्या देशांकडे झाली, व कांहींशी अमेरिकन व्याप्त प्रदेशांत झाली. ३७ टक्के निर्गत अमेरिकन-व्याप्त जर्मनी, जपान व कोरिया ह्या देशांकडे झाली. सुमारें ४० टक्के निर्गत मार्शल योजनेप्रमाणें मदत मिळणाऱ्या देशांकडे झाली. हिंद, दक्षिण आफ्रिका व इजिप्त मिळून २३ टक्के निर्गत झाली. निर्गत झालेल्या एकंदर धान्यापैकीं गहूं व गव्हाचा माल यांचें प्रमाण शेकडा ७७ होतें.

## कोऑपरेशन ॲंड अकौन्टन्सी डिप्लोमा

एप्रिल, १९४९ मध्यें पुणें येथें झालेल्या परीक्षेंत खालील उमेदवार उत्तीर्ण झाले आहेतः—

**सबंध परीक्षेंत उत्तीर्ण**

**दुसरा वर्ग**

Jahagirdar H. A.

**पास वर्ग**

Byahatti S. K., Chiniwar G. B., Hubli C. S., Kher A. N., Kumbhari H. K., Sakle A. H., Saunshi B. A., Tarte N. S., Akolkar N. S., Herkal V. V., Muttagi P. S., Patil U. S., Sarnaik W. A.

**फक्त अकौन्टन्सी ग्रुपमध्यें उत्तीर्ण**

Hadalgi M. T., Acharya B. G., Bulla S. T., Hedge R. M., Kadapa S. N., Kurtkoti S. L., Nagasampagi Y. A., Nargunde B. S., Patil E. A., Tewari G. B.

**फक्त कोऑपरेशन ग्रुपमध्यें उत्तीर्ण**

Dongare S. N., Amin S. A., Bhatt R. H., Hadikyal G. N., Pandya D. C., Parandkar S. N., Patel A. M., Torke S. V., Turkani V. M.

## मध्य-पूर्वेकडील औद्योगिक विकास-योजनांबद्दल अमेरिकेचे गार्नर यांचें मत

जागतिक बँक अमेरिकेच्या प्रोत्साहनानें स्थापन झाली आहे. ह्या दृष्टीनें जागतिक बँकेचे उपाध्यक्ष रॉबर्ट गार्नर यांचें मध्य-पूर्वेच्या देशांतील विकास-योजनांबद्दलचें मत उद्बोधक आहे. रॉबर्ट गार्नर हे मध्यपूर्वेकडील देशांत नुकतेच जाऊन आले आहेत. पूर्वेकडील देशांची पाहाणी केल्यावर आपले विचार गार्नर ह्यांनीं जागतिक बँकेच्या सर्व नोकरवर्गाची सभा घेऊन त्यावेळीं मुद्दाम व्यक्त केले. विशेषतः टर्कीबद्दल गार्नर यांचें मत फारच उच्च दर्जाचें बनलें. टर्कीचा विकास तेथील सरळ स्वभावाच्या व उत्साहि जनतेकडून फार जलद होईल असा गार्नर ह्यांना विश्वास वाटतो. मोरोक्को व अल्जीरिया ह्यांचाहि योग्य मार्गानें आर्थिक विकास होत आहे. ह्या देशांची प्रगति विशेषतः शेतीच्या बाजूनें होऊं शकेल. इराणपुढेंहि पुनर्घटनेच्या योजना आहेत परंतु त्या यशस्वी होण्यासाठी खूपच परिश्रम करावे लागतील. सध्यां इराणी जनतेला तेलापासून मिळणाऱ्या पैशांतून आपले पुनर्घटनेचे कार्यक्रम कांहीं थोडीं वर्षें फार पाडतां येतील. गार्नर ह्यांच्या मतें, मध्य-पूर्वेकडील सर्वच देश विकास-योजना फलद्रूप होतील अशा स्वरूपाचे आहेत. त्यांच्या मुख्य अडचणी म्हणजे वहातूक, पाणीपुरवठ्याचीं कामें, व प्रेरक शक्ति ह्या आहेत. आपला विकास ह्या अडचणी दूर करून कसा साध्य करतां येईल याची जाणीव ह्या देशांना पूर्णपणें झाली आहे असें गार्नर ह्यांचें मत आहे. सुधारणा व विकास होण्यासाठी प्रथम ह्या देशांची पैशाची अंतर्गत परिस्थिति स्थिर बाजार भावांच्या दृष्टीनें सुधारली पाहिजे. नंतर विकासाच्या योजना पुऱ्या करण्यासाठी त्यांना परदेशच्या पैशाचीहि जरूरी भासेल. परंतु प्रथम नाणेंबाजाराच्या परिस्थितीची अंतर्गत सुधारणा झाली पाहिजे. शक्य तेथें जागतिक बँक अशा देशांना तांत्रिक मदत देऊं शकेल. कर्जें मात्र विशिष्ट योजना पूर्ण करण्यासाठीच देतां येतील.

टर्कीचा पूर्ण विकास होण्यासाठी तेथें खाजगी उद्योगधंद्यांना पूर्णपणें प्रोत्साहन मिळालें पाहिजे असें गार्नर ह्यांचें मत आहे. खाजगी प्रयत्नांनीं पैसा व धंद्याची व्यवस्था ह्या गोष्टी सोडवितां येतील. तेथील सरकारनें विशेषतः उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें अर्थविस्ताराला पूरक होण्यासाठी वहातुकीचे मार्ग सुधारले पाहिजेत. विशेषतः रस्त्यांवर जास्त भर द्यावा लागेल. बंदरांचीहि सुधारणा केली पाहिजे. टर्की कृषिप्रधान देश असल्यामुळें शेतीमालाची वहातूक व निर्गत ह्यासाठी रस्ते सुधारणें फार आवश्यक आहे. इराणमध्यें आधुनिक पद्धतीनें शेतीची वाढ होण्याची फार शक्यता आहे. पाटबंधाऱ्यांचीं कामें, शेती करण्याच्या पद्धतींत सुधारणा, पुरांचें नियंत्रण, वहातुकीच्या मार्गांची सुधारणा, ह्या गोष्टींची इराणमध्यें विशेष आवश्यकता आहे. पुढील सात वर्षांत इराणची आर्थिक परिस्थिति कशी सुधारतां येईल याची योजना ठरविण्यासाठी इराणनें अमेरिकन इंजिनियर्स नेमिले आहेत. एकंदरींत, गार्नर यांचें मत मध्य-पूर्वेकडील देशांच्या विकास योजनांबद्दल फार अनुकूल झालें आहे. जागतिक बँकेचें मिशन हिंदुस्थानच्या कर्जाच्या मागणीबद्दल माहिती मिळवून नुकतेच परतलें आहे. हिंदच्या योजनांबद्दल सुद्धां अमेरिकेंत अनुकूल अभिप्राय दिसून येतो. हिंदनें रेल्वेची सुधारणा व शेतीची सुधारणा ह्या निश्चित योजनांसाठी जागतिक बँकेकडून कर्जाची मागणी केली आहे. बँक, हिंद व इतर पूर्वेकडील देशांना कर्जें देण्याचा अनुकूलतेनें विचार करीत आहे, असें गार्नर ह्यांच्या बोलण्यावरून दिसतें.


## धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

कोपरगांव, जि. अहमदनगर.

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

**स्थानिक सहकारी बँक**

**सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.**

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेंपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई

( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,२९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,२७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५१ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

1. बँका आणि त्यांचे व्यवहार
2. हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
3. व्यापारी उलाढाली
4. सहकार

### खेळाच्या उपकरणांचा धंदा

हिंदुस्थानची फाळणी झाल्यावर पंजाबांतील खेळांचीं साधनें तयार करणाऱ्या धंद्यांत गोंधळ उडाला होता. परंतु आतां पूर्व-पंजाबांत हा धंदा पुन्हा संघटित होऊं लागला आहे. फाळणीपूर्वी ह्या धंद्याचें मुख्य केंद्र सियालकोट येथें होतें. आतां जालंदर, मीरत, बटाला आणि आग्रा इतक्या ठिकाणीं त्याची विभागणी झाली आहे. हा धंदा ग्रामोद्योग पद्धतीनें करण्यांत येत असून त्यांत १०० पेक्षा अधिक कंपन्या आणि ४०,००० कामगार गुंतलेले आहेत. धंद्याची बाजारपेठ मुख्यत: हिंदुस्थानांत आहे. तथापि क्रिकेटचे व हॉकीचे चेंडू, फुटबॉल्स, क्रिकेटचें सामान, हॉकीच्या काठ्या इत्यादी माल परदेशांत विकला जाईल. ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें १० लाख रुपये किंमतीचा माल इंग्लंडांत आयात करण्याची परवानगी दिलेली आहे. ह्या धंद्यांत पाकिस्तान आणि ब्रिटन हे दोन देश हिंदचे प्रतिस्पर्धी आहेत. हिंदुस्थानांत एका परदेशी कंपनीला हा धंदा सुरू करण्याची परवानगी देण्यांत आली आहे असें समजतें. हें खरें असेल तर देशी धंद्यावर त्याचा अत्यंत अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत मजुरी स्वस्त आहे; आणि हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या मालावर कांहीं देश जकातही बेताची घेतात. त्यामुळें खेळाचीं साधनें परदेशांत स्वस्त विकण्यास परवडतें. ह्या धंद्यास लागणारें लाकूड, चामडें, इत्यादी माल हिंदुस्थानांत विपूल आहे.

### तोतया मॅनेजिंग डायरेक्टराच्या कारवाया

एका अस्तित्वांत नसलेल्या बँकेच्या तोतया मॅनेजिंग डायरेक्टरास व आणखी १० जणांस बिहार प्रांताच्या पोलिसांनीं नुकतीच अटक केली आहे. ह्या "मॅनेजिंग डायरेक्टरा"नें रांची येथें बँकेची शाखा उघडण्यांत येणार असल्याविषयीं वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊन इन्स्पेक्टर्स, कॅशिअर्स, कारकून, इत्यादि जागांसाठी अर्ज मागविले. बँक शेड्यूल्ड बँक व क्लिअरिंग बँक असल्याचें त्यानें जाहीर केलें होतें. निवडलेल्या उमेदवारांकडून जामिनकीसाठी मोठाल्या रकमा घेण्यांत आल्या. "मॅनेजिंग डायरेक्टरा"नें बिहार प्रांतभर दौरा काढून दरभंगा, भागलपूर, आरा, हजारीबाग, इत्यादि ठिकाणीं ह्याप्रमाणें नेमणुका केल्या. बँक कधींच अस्तित्वांत आली नाहीं.

### श्री. मनु सुभेदारांचा सल्ला घेणार

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, श्री. मनु सुभेदार, ह्यांचा इंदूर म्युनिसिपॅलिटीनें सल्ला घेण्याचें ठरविलें आहे. म्युनिसिपॅलिटीचें उत्पन्न वाढविण्याचे मार्ग ते सुचविणार आहेत. इंदूर येथें घरपट्टी फक्त ७% आहे, हें पाहून त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें.

### साखरेच्या धंद्याच्या संरक्षण मुदतींत वाढ

हिंदी टॅरिफ बोर्डानें साखरेच्या धंद्यास असलेलें संरक्षण ३१ मार्च १९५१ अखेर म्हणजे आणखी दोन वर्षें चालू रहावें असें सुचविलें होतें. परंतु, हिंदुस्थान सरकारनें तें ३१ मार्च १९५० अखेर चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. साखरेचा उत्पादन खर्च उतरविण्यासाठी टॅरिफ बोर्डानें कित्येक सुधारणा सुचविल्या आहेत. सरकार त्यासाठी एक तज्ज्ञांची कमिटी नेमणार आहे.

संरक्षण किती आहे, हें पहाताना आयात साखरेस पडणारी किंमत लक्षांत घेतली पाहिजे. सध्याच्या हिशेबाप्रमाणें, संरक्षणाचा बोजा ३६% पडतो. गिऱ्हाइकांस तो असह्य वाटण्याचें कारण नाहीं, असें टॅरिफ बोर्डाचें म्हणणें आहे.

**बस सर्व्हिससाठी कर्ज**—सुरत म्युनिसिपल बोर्डानें शहरांतील बस सर्व्हिस आपल्या मालकीची करण्यासाठी ३॥ टक्के व्याजाच्या दरानें ४ लाख रुपयांचें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी पूर्वी एकदा ३ टक्के व्याजाच्या दरानें कर्ज उभारण्यांत आलें होतें. परंतु तें फारसें खपलें नाहीं. ह्या कर्जापायीं जमा झालेले ४४,००० रुपये आता परत करण्यांत येणार आहेत. नवीन कर्जासाठी मुंबई सरकारकडे परवानगी मागण्यांत आली आहे.

**पोलादाच्या किंमतींत झालेली वाढ**—पोलादाच्या किंमतींत दर टनामागे ५० रुपये वाढ केल्याचें हिंदुस्थान-सरकारनें नुकतेंच जाहीर केलें आहे. ह्या वाढीसंबंधीं खुलासा करतांना टाटा आयर्न आणि स्टील कंपनीचे डायरेक्टर सर जहांगीर गांधी म्हणाले, कीं किंमतींत झालेला सर्व वाढावा कंपनीला मिळतो ही समजूत चुकीची आहे. हिंदुस्थानांत परदेशाहून सध्या आयात केलें जाणारें पोलाद त्याच्या येथील उत्पादनाच्या खर्चापेक्षाही कमी किंमतीला विकलें जात आहे. परदेशीय पोलादाच्या किंमती आणखी कमी करण्यासाठीच ह्या वाढाव्याचा उपयोग सरकार करणार आहे. गेल्या मे महिन्यापासून दर टनामागें वाढविण्यांत आलेले १८ रुपये मात्र कंपनीला मिळतात. ह्या १८ रुपयांच्या वाढाव्याचा उपयोगही मजूरवर्गाला अधिक सवलती देण्यांत आणि खर्चात झालेली वाढ भरून काढण्यांत झाला आहे.

**हिंदमधील गुळाचा व साखरेचा खप**—हिंदुस्थानांत दर माणशीं दरवर्षी ६·५ पौंड गूळ आणि २० पौंड साखर इतका खप होतो. साखरेचा खप इतर कांहीं देशांतून पुढीलप्रमाणें आहे. इंग्लंड १०६ पौंड, अमेरिका ९७ पौंड, ऑस्ट्रेलिआ १६० पौंड.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २ कोटींचे वर |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन), श्री. श्री. गो. मराठे (व्हाइस चेअरमन),
श्री. न. ग. पवार, श्री. फ. ह्वो. पदमजी,
श्री. मा. रा. जोशी, श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. मा. वि. शहा, श्री. मो. रा. ढमढेरे.
श्री. मा. म. गुने,

★ चालू खात्यावर द. सा. द. शें. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
★ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★ मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★ सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २ } सी. व्ही. जोग, मॅनेजर.

(पॅरॅमाउंट लि.)

## परदेशांतील बातम्या

**अणु संशोधनाच्या कारखान्यांतील संप मिटला**—अमेरिकेच्या ओक रिज ह्या सर्वांत मोठ्या अणु संशोधनाच्या कारखान्यांतील २,००० कामगारांनीं संप करण्याची तयारी चालविली होती. कामगारांत आणि सरकारच्या प्रतिनिधींत पगारवाढीसाठी बोलणीं चालू होतीं. तीं यशस्वी होऊन कामगारांना दर तासागणिक ८ सेंट अधिक पगार देण्यांत यावा, असा नवा करार आतां करण्यांत आला आहे.

**ऑस्ट्रेलिआचा तेलासाठी शोध**—डच वसाहती आणि मध्यपूर्वेतील देश येथें तेल उपसण्याची परवानगी मिळविण्याची खटपट ऑस्ट्रेलिअन सरकारनें चालविली होती. परंतु त्या खटपटींत अपयश आल्यामुळें सरकारनें तेलाचें संशोधन करण्यासाठी अमेरिकेंतून यंत्रसाहित्य आणण्याचें ठरविलें आहे. हें साहित्य हातीं आल्यावर खुद्द ऑस्ट्रेलिआंत, न्यू गिनींत आणि पापुआंत तेलाचे सांठे सांपडतील किंवा काय त्याचा शोध करण्यांत येणार आहे.

**प्राणिसंग्रहालयासाठीं हिंदी कासवें**—ब्रुसेल्स येथील प्राणिसंग्रहालयासाठीं भेट म्हणून दोन मोठ्या पाली आणि आठ कांसवें नुकतींच विमानानें पाठविण्यांत आलीं. ह्या प्राण्यांची बेल्जममधील प्राणिशास्त्रज्ञांना फार जरूर होती. दिल्ली विद्यापीठातर्फे देण्यांत आलेल्या वरील दोन पाली ५ फूट लांब आहेत. अशा प्रकारच्या पाली आणि कांसवें फक्त हिंदुस्थानांतच मिळूं शकतात, असें म्हणतात.

**उत्तर चीनमध्यें लांब धाग्याचा कापूस**—चीनच्या कम्यूनिस्ट वृत्तसंस्थेनें दिलेल्या माहितीप्रमाणें, उत्तर चीनमध्यें ४०,००० एकर जमिनींत लांब धागे निघूं शकणाऱ्या अमेरिकन कापसाची लागवड करण्यांत आली आहे.

**चीनला मदत करण्यास विरोध**—अमेरिकन सिनेटमध्यें चीनला १५० कोटी डॉलर्सची मदत करण्यासंबंधींच्या एका बिलावर चर्चा चालू आहे. चीनमधील सध्याची परिस्थिति आणि नजीकचा भविष्यकाल लक्षांत घेतां अशी मदत करणें योग्य होणार नाहीं, असें मत अमेरिकेचे फडणीस मि. जॉन स्नायडर ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

**सर्वांत अधिक पगार मिळविणारी अमेरिकन स्त्री**—बेटी ग्रॅबल ह्या अमेरिकन नटीला अमेरिकेंतील कोणत्याही स्त्रीपेक्षा अधिक पगार मिळतो. अमेरिकेच्या फडणिशी खात्यानें कंपन्यांच्या नोकरांना मिळणाऱ्या पगारांची जी माहिती प्रसिद्ध केली आहे, तींत बेटी ग्रॅबलचा उल्लेख आला आहे. १९४७ सालीं तिला ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स फिल्म्स कॉर्पोरेशनकडून २,०८,००० डॉलर्स मिळाले. ही रक्कम ऑलिव्हिआ डी हॅविलंड ह्या नटीला मिळालेल्या वेतनापेक्षा ४,००० डॉलर्सनीं अधिक आहे.

**चिनी कम्युनिस्टांना व्यावहारिक मान्यता**—चीनमधील कम्युनिस्ट राजवटीला कायदेशीर मान्यता मिळणें असंभवनीय असलें तरी व्यावहारिक मान्यता देण्यांत येईल, असे उद्गार ऑस्ट्रेलिआच्या परराष्ट्रीय खात्यांतील एका अधिकाऱ्यानें काढले. अमेरिकेंतील आणि ब्रिटनमधील बऱ्याच व्यापारी कंपन्या अशी मान्यता देण्याविषयीं आपआपल्या सरकारांना आग्रह करीत आहेत. ह्या कंपन्यांचे बरेच मोठे व्यापारी हितसंबंध चीनमध्यें गुंतलेले आहेत.

बेडेकर लोणचीं

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला
ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.
ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.
टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठी चौकशी करा:—
दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें
(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले:—. रेवि ॲले, किं. २ रु.)
(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स (ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.